# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ३०.०७.२०२६ गुरुवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला जन्मठेप कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ३०.०७.२०२६ रोजी, मा. जिल्हा न्यायाधीश—२१ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. आर. तोतला साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ९४/२०१८ मधील, पोलीस ठाणे धंतोली येथील अप. क्र. १९६/२०१७ कलम ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी सुरज विशेषराव कोटनाके, वय २४ वर्षे, रा. ईसापुर, उपरवाडी, राजुरा, जि. चंद्रपुर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०२ भा. दं.वि. अन्वये जन्मठेप व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

यातील आरोपी व मयत हे दोघेही मध्यवर्ती कारागृह येथे जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना, दिनांक ११. ०९.२०१७ चे ०७.०० ते ०७.१५ वा चे दरम्यान, यातील आरोपीने मयत नामे आयुष निर्मल पुगलिया यास डोक्यावर फरशीने मारुन व पत्र्याचे तुकडयाने गळयावर वार करुन जिवे ठार केले होते. जेलरक्षक फिर्यादी अशोक वसंत घुले, वय ३० वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १५.०९.२०१७ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शेंडे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. खुळे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्रीमती सुषमा कुमार यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. सुषमा बेले व मपोअं सविता यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**कोराडी पोलीसांची कामगिरी :— शस्त्रासह धुमाकुळ घालणारा आरोपी अटक.**

दिनांक २९.०७.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, कोराडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना कोराडी देवी मंदीरकडे जाणाऱ्या तलावाचे रोडवर एक इसम हातात शस्त्र घेऊन धुमाकुळ घालतांना दिसून आल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील शस्त्र काढून घेऊन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रमोद पांडुरंग धुर्वे, वय ३१ वर्षे, रा. श्रीवास नगर, वार्ड नं. ५, शेंडे किराणा स्टोअर्स जवळ, महादुला, कोराडी, नागपूर असे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू कि. २००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने हातात शस्त्र घेऊन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री. गणेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. विनोद मातरे, पोहवा. लिलाधर गोडणे, पोअं. योगेश वंजारी व बबन वैद्य यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नवीन कामठी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २९.०७.२०२६ चे २२.५० वा. चे सुमारास, नवीन कामठी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, जयस्तंभ चौकाजवळ एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळतांना दिसून आला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख सलमान उर्फ अब्बु वल्द शेख हुसेन, वय २८ वर्षे, रा. चित्तरंजन नगर, अब्दुल शहा दर्गाह जवळ, कामठी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणून, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२६ दिनांक २२.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता, पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. नितेश नवघरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. विकास तिडके यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी आदेश भोलेनाथ नन्नावरे वय २८ वर्षे, रा. गाव येरखेडा ता. चिमुर जि. चंद्रपुर, ह.मु.—डी ब्रदर्स समोर, बुटीबोरी जि. नागपूर यांचे शेजारी राहणारे मित्र नामे राहुल अनिल महाजन, वय २६ वर्ष, रा. शांतीनाथ रोड, आझाद वार्ड, रामटेक यांनी फिर्यादीची एक्स्ट्रीम दुचाकी क्र. एमएच ३४ सीएम ४४९२ घेवुन भंडारा येथे गेले होते. दिनांक ३०.०७.२०२६ चे ००.०१ ते ०१.०० वा. चे दरम्यान, भंडारा येथुन परत बुटीबोरी येथे जात असतांना, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, आऊटर रिंग रोडवरील राज रॉयल हॉटेलसमोर, कोणत्यातरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्र चालवित असलेल्या मोटरसायकलला धडक देवुन, गंभीर जखमी करून, जागीच त्यांचे मरणास कारणीभूत होऊन घटनास्थळाहुन पळुन गेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे मानकापूर :—** सुमित शाम गिरी, वय ४० वर्षे, रा. प्रादेशिक मनोरुग्णालय, मानकापूर, नागपूर हे दिनांक १९.०७.२०२६ रोजी ०६.०० वा. पासून पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील प्रादेशिक मनोरुग्णालय येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ३ इंच, केस—काळे डोळे—काळे, अंगात—रुग्णालयाचा पोशाख हिरवा शर्ट पॅन्ट घातलेला आहे. भाषा—मराठी बोलतात. ओळखचिन्हे— मनोरुग्ण आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापूर :—** सत्येंद्र उर्फ छोटू पुरण यावद, वय २६ वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, संतोष भरतवार यांचे शेतात, नागपूर हे दिनांक ०६.०६.२०२६ रोजी १४.३० वा. पासून पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला

असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांब, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ७ इंच, केस–काळे, डोळे–काळे, अंगात– निळा टिशर्ट व लोअर पॅन्ट घातलेला आहे. भाषा–मराठी बोलतात. ओळखचिन्ह– डावे हातावर टॅटु गोंदलेला आहे.


सुमित


सत्येंद्र उर्फ छोटू

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४००२४ /२००४ | कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | १) अंबर चोखीनाथ नारंजे रा. अ)नवी शुक्रवारी, चांदणीपुरा, नागपुर. ब) एनआयटी क्वॉर्टर, म्हाळगी नगर, नागपूर.<br>२) रमेश लक्ष्मण मेश्राम, रा. गुजरवाडी, डालडा कंपनी चौक, गणेशपेठ, नागपूर. | १०.०८.२०२६ |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०८०३४३ /१९९८ | कलम ३२६ भा.दं.वि. | भोलाराम भगतराम शाहू, वय ५० रा. सिदधार्थ नगर झोपडपट्टी, महादुला, कोराडी, नागपूर. | १०.०८.२०२६ |
| ३. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०२०७ /२००१ | कलम ३२४ भा.दं.वि. | श्रीराम हरीभाऊ मसराम, रा. बैरामजी टाऊन, आदिवासी नगर, ख्रिश्चन कब्रस्तान जवळ, मोटघरे यांचे घरी किरायाने, नागपूर. | १०.०८.२०२६ |
| ४. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०४०१७२ /१९९६ | कलम २९४, ५०६, ४२७, ३४ भा.दं.वि. | १) बंडु महादेव भगत, वय २५ वर्ष, रा. अजनी चौक, अजित बेकरी मागे, नागपूर.<br>२) प्रमिला अशोक डंबारे, वय २९ वर्ष, रा. अजनी चौक, एनआयटी बिल्डींग, नागपूर.<br>३) पुरुषोत्तम महादेव भगत, वय ३७ वर्ष, रा. गजानन नगर, | १२.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | जाफळे हयांचे घराजवळ, त्रिमुर्ती नगर, नागपूर.<br>४) शांताबाई महादेव भगत, वय ५० वर्ष, रा. अजनी चौक, अजित बेकरीचे मागे, नागपूर. | |
| ५. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०४०१७२ /१९९६ | कलम २९४, ५०६, ४२७, ३४ भा.दं.वि. | बंडु महादेव भगत, रा. अजनी चौक, अजित बेकरी मागे, नागपूर. | २०.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**